REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# इसिस चे भारतीय सुरक्षेपुढील आव्हान



**प्रा.प्रशांत प्रभाकर सराफ**
**सैनिकशास्त्र विभाग , श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी.**

*जुलै २०१४ ला इसिस या कट्टर दहशतवादी संघटनेचा जागतिक राजकारणात झालेला उदय निश्चितच चिंताजनक आहे. इराक व सिरीया याराष्ट्रांच्या काही भागावर ताबा मिळवून या संघटनेने इस्लामिक राज्य स्थापन केले. तालिबान ने ज्या प्रकारे १९९६ मध्ये अफगाणिस्तान मध्ये राजवट निर्माण केलीहोती त्याच प्रकारे इसिस चा मुलभूत विस्तार दिसुन येतो. जागतिक शांततेसाठीहे मोठे आव्हान आहे उदा. युरोपीय राष्ट्रांवर केलेले दहशतवादी हल्ले. विशेष संदर्भ फ्रास. भारतातील सामाजिक वीण अशा प्रकारची आहे की इसिसला प्रवेश करण्याचीसंधी मिळू शकते.*

## प्रस्तावना:-

भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोक्यात आणनाऱ्या प्रमुख घटकांपैकी दहशतवाद हा एक घटक आहे. १९८० च्या दशकापासुन भारत दहशतवादाचा सामना करत आहे. भारतात दहशतवादाचा प्रसार दोन टप्प्यांमध्ये दिसून येतो. १९८० ते २००० हा पहिलाटप्पा यांचे भौगोलिक क्षेत्रफळ पंजाब व जम्मु-काश्मीर पुरतेच मर्यादितहोते. दहशतवाद प्रसाराचा दुसरा टप्पा २००१ नंतर सुरु झालेला दिसुन येतो. इथे दहशतवादी कारवायांनी भौगोलिक सीमा ओलांडलेली दिसते. भारतातील प्रमुख शहरे, व्यापारी केंद्रे, धार्मिकस्थळेही दहशतवाद्यांची लक्ष्य बनत गेली. भारतात दहशतवादाच्या प्रश्नाकडे कायदा व सुरक्षेचा प्रश्न म्हणुन पाहिले जाते. पोलिस यंत्रणेच्या माध्यमातून त्याचा मुकाबला करण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणुनच अनेक अडचणी निर्माण होताना दिसतात त्याचा परिणाम सर्वसामान्याच्या सुरक्षा व्यवस्थेवर दिसुन येतो. भारतातूनच दहशतवादी कारवायांसाठी गट, स्लिपरसेलतयार करणेही पाकिस्तानची योजना काही अंशी यशस्वी झालेली दिसुन येतेत्याचेश्रेय धार्मिक मूलतत्ववादात दिसुन येते. अलीकडच्या काळात इसिस या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेचाझालेला उदयहा धार्मिक मूलतत्ववादी विचार सरणीतूनच आहे. भारतातील असणारीअंतर्गत परिस्थितीत्यामुळे इसिसचे वैचारिक आव्हान निर्माण होताना दिसते. भौगोलिक दृष्टीने भारता पासूनहजारो मैल लांब असणाऱ्या या संघटनेचे अस्तित्व जहाल धार्मीक विचारप्रणालीतून भारतात निर्माण होताना दिसते. महाराष्ट्र, केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तरप्रदेश,तेलंगणा या राज्यातील काही मुस्लीम युवक या दहशतवादी संघटनेकडे आकर्षित झालेले आढळून येतात. भारताच्या राष्ट्रीयसुरक्षेपुढेहे कडवे सामाजिक आव्हान आहे. या अनुषंगानेसदरील शोधनिबंधा मध्येचर्चा केलेली आहे.

## इसिस ची ओळख:-

इस्लामिकस्टेट ऑफ इराक अँड सिरियाहे इसिस चे पूर्ण नाव आहे. (Islamic State of Iraq and Syria) इसिस च्या उदयाची पार्श्वभूमी २००३ च्या इराक-अमेरिकासंघर्षातूनदिसुन येते. इराक मधील अलकायदा इन इराक, द इस्लामिकस्टेट ऑफ इराक, व मुजाहिदीन शुरा कौन्सिलसारख्या अनेकसुन्नी दहशतवादी संघटनामधुन इसिस चा जन्म झाला. उत्तर इराक व पूर्व सिरीयाचा भाग इसिच्या चळवळीचे मुख्य केंद्र आहे. [१] मध्यपूर्व भागातील शिया राजवटी विरोधात हीसंघटना अधिक कडवी दिसुन येते. सुन्नी इस्लामिक राजवटीची स्थापना व सुन्नी मुलतत्ववादी विचारप्रणाली द्वारे इस्लामिक राजवटीचा विस्तार हे या संघटनेचे ध्येय आहे. अबु बकर अल बगदादी हा या संघटनेचासंस्थापक आहे.

## इसिस चे आर्थिकसंघटन आणि दहशतवादी बळ:-

इसिस संघटनेची व्याप्ती, प्रसार, मुलतत्ववादी विचार हा अर्थकारणाच्या आधारे दिसुन येतो. इसिस ने आर्थिकसंघटन मजबुत करण्या करिता जगभरातील मुस्लीम युवकांना नौकरी करण्याकरीता या क्षेत्रात यावे असे आवाहन केलेले आहे.इसिस नेआधिकार प्राप्त भोगोलीक क्षेत्रातील मुलभूत खनिजांवर, साधनांवर ताबा मिळविलेला दिसून येतो. पाकिस्तान गुप्तहेरसंघटना आय.एस.आय च्या हवाल्यानुसार सुमारे दोन

अब्ज डॉलरचीसंपत्ती असलेली इसिस जगातील सर्वात श्रीमंत दहशतवादी संघटना आहे. इसिस च्या ताब्यात असलेल्या भूप्रदेशातील खनिज तेल व नैसर्गिक वायुंच्या साठयांवर नियंत्रण आहे.[२] काळया बाजारात कच्च्यातेलाची स्वस्त दरात विक्री करुन प्रचंडसंपत्ती गोळा केलेली आहे. यामुळे अनेक राष्ट्रांच्या अर्थ व्यवस्थेवर परिणाम दिसुन येतो. इसिस संघटनेनेसंपत्ती मिळवण्यासाठी वेगवेगळया मार्गाचा अवलंब केलेला दिसुन येतो. जसेकीअपहरण करणे, खंडणी वसुल, बॅक दरोडे, दळणवळणाचे आधुनिक जाळे या मार्गाने देखीलसंपत्तीगोळा केलेली आहे. सौदी अरेबिया व इतर आखाती देशाकडून मानवतावादी कार्याच्या नावाखाली निधी या संघटनेकडे वळविला आहे. अर्थकारणाच्या बळावरच जिहादीसैनिक व शस्त्रास्त्रांचे बळ ही वाढविले आहे.अमेरिकी गुप्तचर संस्था CIA च्या दाव्यानुसार इसिस कडे ३० हजार पेक्षा अधिक दहशतवादी आहेत. आधुनिक तंत्रज्ञान व सोशल मिडीयाच्या माध्यमातून दहशत निर्माण करण्यात हीसंघटना यशस्वी होत आहे.

### इसिस कडील शस्त्र साधने :-

इसिस कडे आधुनिक शस्त्रास्त्रे M-६०, M-२४० मशिनगन्स, स्टिंगर क्षेपणास्त्र, एम-१६ रायफल, ग्रेनेड लॉचर्स इ.चा वापर दिसुन येतो. विशेष म्हणजेही अमेरिकन बनावटीची शस्त्रास्त्रे आहेत. याशिवाय रात्रीच्या शोध मोहिमांसाठी अत्याधुनिक गॉगल्स व हेल्मेट या संघटनेकडे आहेत. तुर्कस्थान, सौदी आरेबीया या राष्ट्रांकडुनही शस्त्रास्त्रे प्राप्त केलेली दिसून येतात. याशिवायवेगवेगळया देशांमध्ये इसिस चेहस्तक पसरलेले आहेत. डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर इसिस पदोपदी करत असते. जगभरातील मुस्लीम युवकांना आपल्या संघटनेत सहभागी होण्यासाठीची आवाहन Facebook, WhatsApp, Twitter, Kick या माध्यमाद्वारे केले जाते.[३]सोशल मिडीयाच्या माध्यमातून इसिस साठी नवीन भरती, आर्थिक पाठबळ, पुरविले जाते. इसिस चे आव्हान जागतिकतर आहेच पण भारताच्या दृष्टीने सामाजिक व वैचारिक देखील आहे.

### इसिस आणि भारत :-

भारत हा विविध जाती धर्मांचा, रुढी, परंपरांचा देश आहे. विविधतेतून राष्ट्रीयसुरक्षा टिकविणे हे कठीण काम आहे. राष्ट्रीय एकता आणि अखंडता राजकीय स्वातंत्र्य, लष्करी बळ यावर अवलंबून नसुन सामाजिक, आर्थिक घटक देखील महत्वाचे आहेत. राष्ट्रीयसुरक्षेची प्राथमिकतासीमांचे व्यवस्थापन व परकीय आक्रमण थोपविणे हे आहेच. पण जागतिकीकरणाच्या युगात राष्ट्रीयसुरक्षेची संकल्पना व व्याप्ती व्यापक झाली आहे.[४]सुरक्षेचीसंकल्पना सामाजिक, राजकीय, आर्थिक घटकांभोवती दिसुन येते. स्वातंत्र्यानंतर भारतात जातीय धार्मिक विषयांवर अनेक दंगली झालेल्या आहेत. प्रत्येक वेळेस त्या संघर्षाची सामाजिक, आर्थिक, राजकीय कारणे वेगवेगळी आहेत. आज धार्मिक मूलतत्ववाद वाढल्यामुळे भारताच्या सुरक्षेला धोका निर्माण झालेला आहे. इसिस चा प्रसार व प्रचार धार्मिक मूलतत्वादाच्या आधारेच आहे. पुर्वीच्या काळी जिथे मुस्लीम लोकांची राजवट होती किंवा सत्ता होती अशा सगळया भूभागावर इसिस ला आपल वर्चस्व निर्माण करायचे आहे. सहाजिकच भारताचा त्यात समावेश आहे. भौगोलीक दृष्टीनेहे शक्य नसल्यामुळेवैचारिक दृष्टीनेहे कडवे आव्हान दिसुन येते.

(५)







### इसिस चे प्रयत्न :-

भौगोलिक दृष्टीनेहजारो मैल लांब असणाऱ्या या दहशतवादी संघटनेनेसोशल नेटवर्किंग साइटस च्या माध्यमातून भारतात पाय रोवण्यास सुरुवात केलेली दिसुन येते. विविध राज्यातून शेकडो तरुण इसिस मध्ये सहभागी तसेच कार्यरत असल्याचे निष्पन होत आहे. उदा. २०१४ मध्ये मुंबई मधील ४ तरुण इराक व सिरीयामध्ये इसिस साठी गेलेहोते.[६]त्यामुळेसुरक्षा यंत्रणा पुढीलहे गंभीर आव्हान आहे. भारतातील सामाजिक परिस्थिती देखील याला जबाबदार आहे. सोशल मिडीयाच्या द्वारे वेगवेगळे व्हिडीओ अपलोड करुन भारतीय युवकांना आपल्याकडे

आकर्षित करण्यात इसिस हीसंघटनायशस्वी ठरली आहे. मानसशास्त्रीय नितीचा अवलंब करुन त्याला धर्माची जोड देऊन युवकांना दहशतवादी कारवायांकडे वळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. दहशतवादी कृत्ये घडविण्यासाठी भारतीय युवकांना फितविण्याचे कारस्थान करीत आहे . निरपराध नागरिक व सुरक्षा दलांचेसैनिक यांना ठार मारुन दहशत पसरविणे हे या संघटनेचे ध्येय दिसुनयेते. धार्मिक मूलतत्ववादी विचारसरणीमुळे इसिस चे कामसोपेहोत आहे. त्यामुळे धर्माच्या आधारावर भरकटलेल्या युवकांना मुख्य भारतीय प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. इसिस ची पाळेमुळे शहरीतसेच ग्रामीण भागातही रुजत आहे.उदा. औरंगाबाद मधील वैजापूर तालूक्याच्या एका युवकाची नुकतीच झालेलीअटक. इसिस साठी इंटरनेटच्या माध्यमातूनतो युवक भरतीचे काम बघत होता.भारताच्या अनेक राज्यात इसिसचेहस्तक पसरलेले आहेतहे आता हळूहळू निष्पन होत आहे. काश्मीर मध्ये इसिस चे फडकणारे झेंडे या वरुन संघटनेचे स्वरुप दिसुन येते.इसिस ने इराक या देशामधील मोसुल या शहरातु नवर्ष २०१४ मध्ये ४० भारतीय नागरिकांचेअपहरण केले. त्यानंतर ३९ जणांचीहत्याकरण्यातआली. मार्च २०१८ मध्ये भारतीय परराष्ट्र मंत्री यांनी संसदेतया संदर्भात पुरावा मिळाल्यानंतर स्पष्टीकरण दिले. भारता शेजारील राष्ट्रांमध्येसंघटनेला स्थान मिळावे यासाठी इसिस प्रयत्नशील आहे.

## इसिस चा भारतावरील परिणाम :-

i) भारतातील सामाजिक कायदा व सुव्यवस्थेची घडी अस्थिर करण्याची इसिस मध्ये क्षमता आहे.[७]

ii)इराक व सिरीया अशांत राहिल्यास तेलाचे दर भडकण्याची शक्यता खूप आहे. त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणामहोऊ शकतो.

iii) भारतीय युवकांमध्ये कडव्या विचारसरणीच्या इसिस बदल वाढते आकर्षण.

iv) दहशतवादी कारवायांसाठी स्लिपरसेलसक्रीयहोण्याची शक्यता.

v)मध्यपूर्व भागात कार्यरत असणाऱ्या भारतीयांची सुरक्षितता.

म्हणुन भारताने इसिस या दहशतवादी संघटनेसह त्यांच्या सहयोगी संघटनांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. नुसती बंदी न घालता काहीठोस उपाययोजना पण कराव्या लागतील.

## उपाय योजना :-

भारतातील इसिस चे आव्हान मोडून काढण्यासाठीसरकारला वेगवेगळया पातळीवर प्रयत्न करावे लागतील.

i) इसिसच्या वेबसाईटसवर नियंत्रण आणने.

ii) भरकटलेल्या युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनुकुल वातावरण निर्माण करणे.

iii) दहशतवाद विरोधी पथकांकडून युवकांचे ब्रेनवॉश करणे.

iv) रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

v) पालकांकडून, मौलवींकडून युवकांचे समुपदेशन करणे.

vi)सुरक्षा यंत्रणेला अत्याधुनिक नेटवर्किंगच्या माध्यमातूनसुसज्ज व सतर्क करणे.

vii) दहशतवादी कार्यवाही, सहकार्य करणाऱ्यासांठी कठोर कायद्याची निर्मिती व शिक्षा.

## समारोप :-

भारताच्या सुरक्षा व्यवस्थेपुढे इसिस चे आव्हान चिंताजनक आहे. त्यामुळे राजकीय, सामाजिक व्यवस्थेची फेरआखणी करुन अंतर्गत सुरक्षा व्यवस्था बळकट करावी लागणार आहे.तसेच आंतराष्ट्रीय राजकारणातयोग्य भुमिका निभवावी लागणार आहे.

## संदर्भ :-


१)Hassan Hassan, Michael Weiss, ISIS: Inside the Army of Terror,Regan Arts. February 2015, NewYorkPage No.167

२) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारत आणि जग,सकाळ पब्लीकेशन, जून २०१५ पुणे, पृष्ठ क्र.२०८.

३)अतुल कहाते,संकट आयसिस चे, मनोविकास प्रकाशा, जानेवारी २०१६, पुणे, पृष्ठ क्र.९०.

४) डॉ. विजय खरे,जागतिक राजकारणात भारत, के.सागर पब्लीकेशन २०१० पुणे, पृष्ठ क्र.१२८.

५)www.googlemaps.com

६) दै. लोकसत्ता, २६ फेब्रुवारी २०१५, पृष्ठ क्र.९.

७) दै.सकाळ ०३ जानेवारी २०१६.